**विशेष दिवाणी दावा क्र. १२९/२०११**

**CNR No. MHSO060004602011**

कमलाकर साळुंखे (मयत) वारस वगैरे

वि.

बाबुराव जवळेकर वगैरे

## आदेश निशाणी क्र. १४५ वर

०१. दिनांक १६/१२/२००१ रोजीचे अनोंदणीकृत साठेखताच्या आधारे खरेदीखत होवून मिळणेसाठी हा दावा दाखल करण्यात आलेला आहे. परंतु वादी यांनी अद्याप साठेखताचा मुळ दस्त रेकॉर्डवर दाखल केलेला नाही. त्या दस्तावर पुरेसा स्टॅम्प दिलेला नाही. त्यामुळे तो इम्पाऊंड करण्यासाठी साठेखताचा मुळ दस्त वादी यांनी रेकॉर्डवर दाखल करावा यासाठी प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी निशाणी क्र. ३२ प्रमाणे यापुर्वी अर्ज दिला होता. तो अर्ज मा. न्यायालयाने दिनांक १२/१०/२०१८ रोजी मंजूर केला. त्यानुसार वादी यांनी मुळ साठेखताचा दस्त इम्पाऊंड करण्यासाठी न्यायालयात दाखल करावा असे आदेश केलेले आहेत. परंतु सदर आदेशाचे पालन जाणुनबुजून अद्यापपर्यंत वादी यांनी केलेले नाही. त्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहिता ऑर्डर ११ रुल २१ प्रमाणे हा दावा फेटाळण्यात यावा यासाठी प्रस्तुत अर्ज देण्यात आलेला आहे.

०२. त्यावर वादी यांनी त्यांचे म्हणणे दाखल केलेले आहे. वारंवार वेगवेगळे अर्ज देऊन प्रकरण लांबवण्याचा प्रयत्न प्रतिवादी करत आहेत. दिवाणी प्रक्रिया संहिता ऑर्डर ११ रुल २१ च्या तरतुदी या प्रकरणास लागू होत नाहीत. अपुरा स्टॅम्प असेल तसेच मुळ साठेखताचा दस्त रेकॉर्डवर दाखल केला नाही तर त्याचे परीणाम काय होतील याचा विचार अंतिम न्यायनिर्णयाचेवेळी करता येईल. प्रस्तुत मुळ दस्त पंढरपूर येथील मा. न्यायदंडाधिकारी, वर्ग–१, पंढरपूर यांचे न्यायालयातील फौजदारी खटला क्र. १७९/२००३ च्या चौकशीकामी जप्त करण्यात आला आहे. त्यानंतर सही नमुना तपासणीसाठी तो दस्त हस्ताक्षर तज्ज्ञ यांचेकडे न्यायालयामार्फत पाठवण्यात आला. त्यानंतर हस्ताक्षर तज्ज्ञ यांचा

अहवाल मिळालेला आहे. परंतु हस्ताक्षर तज्ज्ञ यांचेकडून मुळ साठेखताचा दस्त न्यायालयाला प्राप्त झालेला नाही. त्यासाठी वादी यांनी प्रस्तुत फौजदारी खटला क्र. १७९/२००३ मध्ये नमूद दस्त मागवण्यात यावा यासाठी दिनांक ०५/०३/२०२१ रोजी अर्ज दिलेला आहे. तो अर्ज प्रलंबित आहे.

०३. तसेच यापुर्वी देखील प्रतिवादी यांनी निशाणी क्र. १३१ प्रमाणे या कारणावरुन दावा फेटाळण्यासाठी अर्ज दिला होता. तो अर्ज मा. न्यायालयाने नामंजूर केलेला आहे. सबब हा देखील अर्ज नामंजूर करण्यात यावा असे वादी यांनी नमूद केले आहे.

०४. दिवाणी प्रक्रिया संहिता ऑर्डर ११ रुल २१ प्रमाणे जर न्यायालयाने आदेश देऊनही एखाद्या व्यक्तीने संबंधीत कागदपत्र रेकॉर्डवर दाखल केले नाही आणि ती व्यक्ती वादी असेल तर आदेशाची पुर्तता केली नाही या कारणावरुन दावा काढून टाकता येवू शकतो. परंतु या प्रकरणामध्ये वादी यांनी नमूद साठेखताची दुय्यम झेरॉक्स प्रत रेकॉर्डवर दाखल केलेली आहे. याबाबत माझे पुर्वीचे मा. पिठासीन अधिकारी यांनी निशाणी क्र. १३१ प्रमाणे अशा प्रकारचा प्रतिवादी यांनी दिलेला अर्ज नामंजूर केलेला आहे. प्रस्तुत मुळ साठेखताचा दस्त हा मा. न्यायदंडाधिकारी, वर्ग–१, पंढरपूर यांचे न्यायालयातील नियमित फौजदारी खटला क्र. १७९/२००३ मध्ये जप्त करण्यात आला आहे. त्यानंतर तो साठेखताचा दस्त हस्ताक्षर तज्ज्ञ, सीबीआय, पुणे यांचेकडे पाठवण्यात आला आहे. त्यांचेकडून तो मुळ दस्त अद्याप न्यायालयाकडे प्राप्त झालेला नाही असे वादी यांनी दाखल केलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. त्यामुळे वादी हे मुद्दाम न्यायालयाच्या आदेशाची पुर्तता करत नाहीत असे म्हणणे योग्य होणार नाही. सबब, मी पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

## <u>आ दे श</u>

अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

स्वाक्षरी/-
दि. १३/१०/२०२१
( श्रीकृष्ण हरीभाऊ इनामदार )
सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, पंढरपूर

## CERTIFICATE

I, affirm that the contents of this PDF file Order are same word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of stenographer | : | A. S. Bavikar |
| Name of the Court | : | Jt. C.J.S.D., Pandharpur |
| Order signed<br>by the P. O. on | : | 13/10/2021 |
| Order uploaded on | : | 14/10/2021 |